# ईशावास्योपनिषद्

**शांति-मंत्र**

ओम् । तें पूर्ण आहे, हें पूर्ण आहें. पूर्णापासून पूर्ण निष्पन्न होतें.
पूर्णातून पूर्ण काढून घेतलें तरी, पूर्णच शेष राहतें.
ओम् शांतिः शांतिः शांतिः ।

(1)
हरिः ओम् । जगांत जें काहीं जीवन आहे, तें हें सर्व ईश्वरानें वसविलेले आहे. म्हणून, त्याच्या नांवानें त्यागून, तूं यथा-प्राप्त भोगीत जा. कोणाच्या हि धनाविषयी, वासना राखू नकोस.

(2)
इहलोकीं कर्मे करीत करीत च, शंभर वर्षे जगण्याची इच्छा धरावी. तुला देहवंताला हाच मार्ग आहे. ह्याहून वेगळा मार्ग नाहीं. मनुष्याला कर्म चिकटत नाही, फल-वासना चिकटते.

(3)
सुवर्णमय पात्रानें, सत्याचे मुख झांकलेलें आहे. हे विश्वपोषक प्रभो ! सत्य-धर्माचा मी उपासक, माझ्या दर्शनासाठी तें तूं उघडें कर.

(4)
तूं ह्या विश्वाचे पोषण करणारा, आणि तूं च एक निरीक्षण करणारा आहेस. तूं नियमन करणारा, आणि तूं उत्तम प्रवर्तन करणारा आहेस. तूं सर्वांचे प्रजावत् पालन करणारा आहेस. तुझे हे पोषणादि रश्मि, उलगडून, आणि एकवटून, दाखव. तुझें जें तेजस्वी आणि परम कल्याणमय रूप, तें मी आतां पाहत आहे. तो जो परात्पर पुरूष, तो मी आहे.

(5)
हा प्राण त्या चैतन्यमय, अमृततत्वांत लीन होवो, आणि मग शरीराची राख होवो. ईश्वराचे नांव घेऊन, हे दृढ-संकल्प-मय जीवा, आठव. त्याचें केलेलें आठव. हे माझ्या जीवा, आठव आपले संकल्प सोडून, त्याचे केलेलें आठव.

(6)

हे मार्ग–दर्शक दैदीप्यमान् प्रभो ! विश्वांत विणलेलीं सर्व तत्वे तुला अवगत आहेत. आम्हांला सरळ मार्गानें, त्या परम आनंदाकडे घेऊन जा. वाकडें जाणारें पाप, तूं आमच्यापासून पिटाळून लाव. तुला आम्हीं पुन्हां पुन्हां नम्र वाणीनें विनवीत आहोंत. तुला आम्हीं पुन्हां पुन्हां नम्र वाणीनें विनवीत आहोंत.

तें पूर्ण आहे, हें पूर्ण आहें. पूर्णापासून पूर्ण निष्पन्न होतें.
पूर्णातून पूर्ण काढून घेतलें तरी, पूर्णच शेष राहतें.
ओम् शांतिः शांतिः शांतिः ।

************

(मूळ – ईशावास्य उपनिषद
मराठी अनुवाद – विनोबा)